# जिल्हा व सत्र न्यायालय, धुळे

# <u>नोटीस</u>

<u>दिनांक ०६/०४/२०२०</u>

ई–कमीटी, मा.उच्च न्यायालय मुंबई यांच्या निर्देशान्वंये सद्यस्थितीत कोविड–१९ कोरोना विषाणुच्या संसर्गाच्या प्रतिबंधात्मक उपायोजनेमुळे वकील व पक्षकार यांना न्यायालयात उपस्थित न रहाणेबाबत सुचित केलेले आहे.

तथापी, न्यायाधीश, विधिज्ञ, पक्षकार याना फक्त अतिमहत्वाच्या प्रकरणांच्या कामाकरीता सोईचे व्हावे यासाठी दिनांक **०६/०४/२०२०** पासुन जिल्हा न्यायालय व तालुका न्यायालयांमार्फत व्हिडीओ कॉन्फरसिंगची सुविधा **<u>फक्त लॉक–डाउन कालावधीकरीता</u>** उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

संबधीत वकीलांनी अतिमहत्वाची प्रकरणांमधील कामकाजाकरीता व्हीडीओ कॉन्फरसिंग सुविधा जिल्हा न्यायालयाचे नविन इमारतीच्या प्रथम मजल्यावर व्हिडीओ कान्फरसिंग कक्ष खोली क्र. **F14** मध्ये उपलब्ध करुन दिलेली आहे. सदर सुविधा कार्यालयीन वेळेत सकाळी ११.०० ते दु.२०० वाजेपर्यंत सुरु राहील. संबधीत वकील व्हीडीओ कॉन्फरसिंग कक्षामध्ये त्याचे प्रकरणांचे कामकाज सादर करतील व त्या त्या दिवशी ज्या न्यायीक अधिकारी यांचेकडे कार्यभार सोपविण्यात आलेला आहे ते त्यांचे निजीकक्षामधील/न्यायदानकक्षामधील संगणकाच्या मदतीने VidyoDesktop/ व्हिडीओ कान्फरसिंगव्दारे सुनावणी घेतील.

त्याचप्रमाणे संबधीत तालुका न्यायालयामध्ये उपलब्ध असलेल्या व्ही.सी.कक्ष अथवा कोर्ट हॉल मधील संगणकाच्या मदतीने VidyoDesktop व्दारे संबधीत वकील त्याचे अतिमहत्वाच्या प्रकरणांमधील कामकाज सादर करतील व संबधीत तालुका न्यायालयातील न्यायीक अधिकारी त्यांचे निजीकक्षामधुन संगणकाच्या साहयाने व्हिडीओ कॉन्फरसिंग व्दारे सुनावणी घेतील.

संबधीतांना याव्दारे सुचित करण्यात येते की उक्तनमुद कार्यपध्दती राबवितांना

कोविड–१९ बाबतचे केंद्र व राज्य सरकार यांचेमार्फत पारीत केलेल्या सूचनांचे / नियमांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.

**सदर व्हीडीओ कॉन्फरसिंगची सुविधा फक्त लॉक–डाउन कालावधीकरीताच उपलब्ध राहील.**

तसेच न्यायालयांमधील सदरची व्हीडीओ कॉन्फरसिंग सुविधा बी.एस.एन.एल यांचेमार्फत जोडण्यात आलेल्या ब्राडबॅण्ड/एमपीएलएस तसेच एनआयसी यांचे व्हीडीओ कॉन्फरसिंग बाबतीची सेवा यांचेवर अवलंबुन आहे. सदर बी.एस.एन.एल यांचे जोडणीत / वेगातील फरक तसेच एनआयसी यांचेकडील व्हीडीओ कॉन्फरसिंग च्या सेवेत काही तांत्रीक अडचण आल्यास जिल्हा / तालुका न्यायालयांमधील व्हीडीओ कॉन्फरसिंग सुविधेमध्ये अडथळा येवू शकतो याबाबत संबधीतांनी कृपया नोंद घ्यावी.

6-5-20

प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश,
धुळे